N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** मानोरा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0466 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**27/08/2026 23:41

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 27/08/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/08/2026
**Time From (वेळेपासून):** 15:14 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:46 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/08/2026 **Time (वेळ):** 23:13 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 054

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/08/2026 23:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 1.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ता क कार्य मानोरा दिग्रस रोडवर,मानोरा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पोनि अलका मोहन गायकवाड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाप्रवि वाशिम ,वाशिम ,मानोरा ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाप्रवि वाशिम ,वाशिम ,मानोरा ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8329033177

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | उमेश सुभाष राठोड | | | 1. तालुका कषी कार्या मानोरा , मानोरा ,मानोरा ,वाशिम,महाराष्ट्र, भारत<br>2. रा खोपडी मिराशी दारव्हा , दारव्हा ,दारवा ,यवतमाळ, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | नगदी 25000 | 25,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

25,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद कॅम्प पो.स्टे.मानोरा दिनांक:- 27/08/2026मी अल्का मोहन गायकवाड, वय -39 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम, मो.नं.8329033177.मी आज रोजी सरतर्फे समक्ष फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंध विभाग वाशिम येथे पोलीस निरीक्षक म्हणुन 04/09/2024 पासुन कार्यरत आहे. दि. 10/08/2026 रोजी लाप्रवि कार्यालय वाशिम येथे कर्तव्यावर हजर असतांना पो.उप. अधि.जगदीष परदेशी यांनी मला तक्रारदार यांचा फोन नंबर पाठवुन तक्रारदार यांचेशी संपर्क करुन त्याचे तक्रारी संबधाने कारवाई करण्याच्या फोनव्दारे सुचना दिल्या. मी तक्रारदार यांचे फोनवर फोन केला असता त्यांनी मला लोकसेकाविरुध्द लाच मागणी बाबत तक्रार असल्याचे सांगीतले. तसेच तक्रारी करीता दि.10/08/2026 रोजी कारंजा येथे भेटण्याचे सांगीतले वरुन आम्ही मा.मुख्याधिकारी,नगर परीषद वाशिम यांना पत्र देउन दोन शासकिय पंच उपलब्ध करून घेतले. दि.10/08/2026 रोजी आम्ही, सापळा पथक व पंच असे शासकिय वाहनाने कारंजा येथे जाउन तक्रारदार यांची भेट घेतली असता त्यांनी त्यांचे नाव पवन वसंतराव मुराळे,- वय 35 वर्श , व्यवसाय-कृशी सेवा केंद्र इंझोरी, रा.म्हसणी ता.मानोरा जि.वाशिम असे सांगीतले. त्यावेळी आम्ही त्यांना सापळा पथक तसेच दोन्ही पंचांची ओळख करुन देवुन त्यांची तक्रार नोंदवुन घेतली ती पुढीलप्रमाणे, "मी समक्ष तक्रार लिहुन देतो कि, मी वरील ठिकाणी राहत असुन माझे ग्राम इंझोरी ता.मानोरा जि.वाशिम येथे विठ्ठ माउली अॅग्रो एजंन्सीज नावाचे कृशीसेवा केंद्र आहे. दिनांक 08/08/2026 रोजी तपासनी करिता आलेले श्री. उमेश राठोड,गुण नियंत्रण अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय मानोरा हे मला माझ्या दुकानात भेटले. त्यांनी माझे दुकानातील रेकॉर्डची तपासणी केली असता त्रूटी काढल्या व त्रूटींचा पूर्तता अहवाल (खुलासा) सात दिवसाच्या आत तालुका कृषी अधिकारी मानोरा येथील कार्यालयात सादर करण्यास सांगीतला. सादर न केल्यास तुमचे लायसन्स रदद करण्याकरीता जिल्हा कृषी अधिकारी यांच्याकडे अहवाल सादर केला जाईल.सदर लायसन रदद न करण्याचा अहवाल न पाठविण्याकरीता मला 40 हजार रूपये मागितले.मी नाईलाजास्तव त्यांना पैसे देण्याचे मान्य केले. मला माहिती आहे की,त्रूटींची पूर्तता केल्यावर पैसे देण्याची आवष्यकता नाही.तरी श्री उमेश राठोड ,गुण नियंत्रक अधिकारी मानोरा,यांच्यावर लाचमागणी संबंधाने कार्यवाही करावी. श्री उमेश राठोड,गुण नियंत्रण अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय मानोरा यांच्याषी माझा उसनवारीचा तसेच देवाण-घेवाणीचा कोणताही व्यवहार नाही. लाच मागणी संबंधाने कारवाई करावी या करीता तक्रार देत आहे. कारवाई होण्यास विनंती आहे.माझ्या तक्रारी सोबत त्रूटींच्या कागदपत्रांची झेरॉक्स प्रत देत आहे." तक्रारदार यांनी, दिलेल्या तक्रारीवर दोन्ही पंचानी, तक्रारदार यांनी व समक्ष म्हणुन मी सुध्दा सही केली. आम्ही तक्रारदार यांना उमेश राठोड हे आपणास कुठे व कधी भेटतील? अषी विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की, सोमवार किवा मंगळवार दि.10 किंवा 11/08/2026 रोजी ग्राम इंझोरी येथे माझे कृशी सेवा केंद्र दुकानवर येवून भेटनार आहेत असे बोलले होते परंतू दि.10/8/2026 रोजी उमेश राठोड हे ग्राम इंझोरी येथे न आल्याने दि.11/08/2026 रोजी पडताळणी कारवाई करण्याचे ठरले. दि. 11/08/2026 रोजी आम्ही दोन्ही पंच व लाप्रवि स्टाफ असे सरकारी वाहनाने कारंजा लाड ते मानोरा रोडवरील गिरडा फाटा चे लगत असलेल्या मंदिराजवळ येवुन थांबलो. सदर दिवशी ही उमेश राठोड हे ग्राम इंझोरी येथील तक्रारदार यांच्या दुकानात न आल्याने तक्रारदार यांचे विनंती वरुन पडताळणी कारवाई आजरोजी पावेतोची तात्पुरती स्थगीत करण्यात आली व पुढील कारवाई ही तक्रारदार यांचा आम्हाला फोन आल्यावरच केली जाईल



3/8

असे सर्वानुमते ठरले. दि.13/08/2026 रोजी आम्ही, दोन्ही पंच व लाप्रवि स्टाफ हजर असातांना तक्रारदार यांचा फोन आला त्यांनी सांगीतले की,कृषी दुकानाचा त्रृटीपुर्तता अहवाल हा ता.कृशी अधिकारी कार्यालयात सादर करायचा आहे. सदर कार्यालयात उमेश राठोड हे भेटुन लाचेची मागणी करु शकतात. तक्रारदार यांनी मानोरा येथे येण्याची विनंती केल्याने आम्ही, दोन्ही पंच व लाप्रवि स्टाफ असे सरकारी वाहनाने मानोरा येथील बि.एस.एन.एल (दुरभाष के ंद्र) कार्यालय येथे पोहचलो. त्यांतनर तक्रारदार व पंच क्र.01 यांना सुचना दिली की,उमेश राठोड हे तक्रादार यांना नोटीस संबधाने कारवाई न करण्या करीता 40,000/- रु. लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबत तक्रारदार व पंच क्र.01 यांना उमेश राठोड,गुणनियंत्रण अधिकारी यांची भेट घेवून बोलणी करणेकरीता मानोरा ते दिग्रस रोडवरील तालुका कृषी अधिकारी कार्यालय मानोरा येथे पाठविण्यात येणार असून तक्रारदार यांनी उमेश राठोड यांची भेट घेउन बोलनी करावी. तक्रारदार यांना त्यांचे शर्टाचे आतुन व्हाईस रेकॉर्डर लावले व पंच क्र. 01 यांचे सह उमेष राठोड यांचे भेटीकरीता पाठविले. काही वेळाने तक्रारदार व पंच क्र.01 हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले. पडताळणी दरम्यान तक्रारदार व उमेश राठोड यांची ता.कृषी अधिकारी कार्यालय मानोरा येथे भेट झाली. उमेश राठोड यांचे सांगणेवरुन तक्रारदार यांनी कारणे दाखवा नोटीसचा त्रृटीपुर्तता अहवाल हा आवक जावक मध्ये दिला व ओ.सी.प्रत घेउन तक्रारदार व पंच क्र.01 हे तक्रारदार यांचे मोटरसायकलने थोडे अंतर समोर आलेवर तक्रारदार यांना कोणाचातरी मिसकॉल आल्याचे जाणवले. त्यांनी फोन चेक केला असता उमेश राठोड यांनी फोन केल्याचे समजले. तेव्हढयात चारचाकी वाहनाने उमेस राठोड हे तक्रारदार व पचं.क्र01 यांचे मोटरसायकल जवळ आले. तेव्हा तक्रारदार व उमेश राठोड यांचेत संभाषण झाले. सभाशणा दरम्यान उमेश राठोड हे तक्रारदार यांना म्हटले की, काहो फोन काहुन उचलुन नाही राहीले, त्यावर तक्रारदार यांनी उमेश राठोड यांना म्हटले की, फोन सायलेंट वर असलं पाण्याच्यानं फोन खालच्या खिशात ठेवला होता. त्यावर उमेश राठोड हे तक्रारदार यांना म्हटले की, काय म्हणत ते....त्यावर तक्रारदार यांनी उमेश राठोड यांना म्हटले की, तेवढं नाही जमत राठोड साहेब कमी म्हणले तुम्ही.... त्यावर उमेश राठोड हे तक्रारदार यांना म्हटले की, काय म्हणण आल तुमच....यावर तक्रारदर हे उमेश राठोड यांना म्हटले की, एवढे नाही जमणार बाबा...विसक हजारापर्यंत जमन म्हणे, त्यावर उमेश राठोड हे तक्रारदार यांना म्हटले की, मी काही तुम्हाल रब्बीमध्ये त्याच करा म्हणुन काही सांगणार नाही....त्याल म्हणा वर्षाभरातुन एकदा येते म्हणाव त्यांच कराच लागते म्हणाव.......यावर तक्रारदार यांनी उमेष राठोड यांना म्हटले की, बर...बर तेवढा हजाराचा गेले आता समजा... चाळीस च का?... त्यावर उमेष राठोड हे तक्रारदार यांना म्हटले की, नाई नाई वीसच म्हणा..त्या मुन्नारा वाल्याल वीसच.... आणी तापीवाल्यान दहा करावच लागते म्हणा तुम्हाले... यावर तक्रारदार यांनी उमेश राठोड यांना म्हटले की, म्हणजे सगळे मिळुन विस एडजेस्टमेंन्ट होत बा.. माझ.... त्यावर उमेश राठोड हे तक्रारदार यांना म्हटले की, त्याच मी.... तुम्ही जवळुन रूपयाबीन देऊ नका नं.....यावर तक्रारदार यांनी उमेश राठोड यांना म्हटले की, नाई पण त्यांन जसा विशय आहे सगळ्या ांल मलच द्या लागतात नं पैसे.. कधी येता मंग तुम्ही..... यावर उमेश राठोड हे तक्रारदार यांना म्हटले की, मी समजा आता हे कधी वेळ भेटते उद्या परवा त आमच तिकडेच हाय... आता शनिवारी आपल्याल प्रषिक्षण ठेवलेल हाय... पाहु पुढच्या आठवड्यात वगैरे त्याल बोलुन ठेवायच की बॉ... .....यावर तक्रारदार यांनी उमेश राठोड यांना म्हटले की, ठिक हायनं... किती पर्यंत तरी त्यांच समजा , यावर उमेश राठोड हे तक्रारदार यांना म्हटले की, मुनारा वाल्याल विस सांगा.... तापीवाल्याल किमान दहा .....यावर तक्रारदार यांनी उमेष राठोड यांना म्हटले की, म्हणजे तीसक हजार रुपये, यावर उमेश राठोड हे तक्रारदार यांना म्हटले की, हं.... यावर तक्रारदार यांनी उमेष राठोड यांना म्हटले की, बरं या कधी येसाल तुम्ही फक्त फोन करजा , यावर उमेश राठोड हे तक्रारदार यांना म्हटले की, हं.... अशा प्रकारचे संभाशण झाल्यावर उमेश राठोड हे त्यांचे कार ने समोर निघुन गेले. त्यानंतर पंच क्र.01 व तक्रारदार असे तक्रारदार यांचे दुचाकीने आम्ही,पंच क्र02 व लाप्रवि स्टाफ असे बि.एस.एन.एल इंमारत मानोरा येथे थांबलेल्या ठिकाणी परत आले. सदर ठिकाणवरुन गोपणीयता व सुरक्षीततेच्या दुश्टीकोणातुन आम्ही सर्व मानोरा ते कारंजा रोडवरील वापटा फाटयावर थांबुन रेकॉर्डींग ए ैकली असता तक्रारदार यांना त्यांच्या कृशीकेंद्राच्या दिलेल्या नोटीस संबधाने कारवाई न करण्या करीता कृषी औषधी पुरवठा करणा-या कंपनीच्या नावाने उमेश राठोड यांनी तडजोडी अंती 30,000/- रुपये लाचेची मागणी केली व सदरची लाच रक्कम 15 आॅगष्ट झालेनंतर व त्यांचे एक दिवसाचे ट्रेनीग झालेवर पुढील हप्त्यामध्ये स्विकारण्याचे मान्य केले असल्याचे निश्पन्न झाले.दि.25/08/2026 रोजी दुपारी अंदाजे 12.30 वा चे सुमारास आम्हाला तक्रारदार यांनी फोन करून सांगितले की,राठोड साहेब हे माझे दुकानात आले आहेत. लवकर या. त्यावर आम्ही तात्काळ पंच उपलब्ध करून शासकीय वाहनाने तक्रारदार यांचे सांगणेप्रमाणे त्यांचे कृषी सेवा केंद्र इंझोरी कडे जात असतांना आम्ही तक्रारदार यांना फोन केला असता तक्रारदार बोलले की,ते पत्नीला दवाखान्यात घेवून कारंजा येथे आले आहेत. मी पत्नीला दवाखान्यात पोहचवून येतो .तुम्ही कारंजा चे रामायण हॉटेल जवळ या. वरून आम्ही पथकासह रामायण हॉटेल चे जवळ गेलो असता गेलो असता तक्रारदार यांनी

सांगितले की, राठोड साहेब हे आज अचानक माझे दुकानात आले होते. राठोड साहेबांनी आज परत माझे दुकानातून सॅम्पल तपासणीकरीता घेवून गेले. त्यावर आम्ही त्यांना आणखी काय बोलणे झाले असे विचारणा केली असता , राठोड साहेब यांनी सॅम्पल नेले तसेच लाच रक्कमेबाबत पुन्हा चर्चा करून 25,000 रू लाच रक्कम स्विकारण्याची तयार असल्याबाबत मान्य केले व ताबडतोब दुकानातून निघून गेले.अशी हकिकत तक्रारदार यांनी सांगितली. पत्नीचा दवाखाना झाल्यानंतर मी राठोड यांचे मोबाईलवर कॉल केला असता ते दुपारीच त्यांचे गांवी निघून गेले असून परवा मानोरा येथे येणार असल्याचे सांगितल्याने दि.27/8/2026 रोजी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले . आज दि.27/8/2026 रोजी आम्ही शासकीय पंचासह ,लाप्रवि पथक असे सापळा कारवाई करीता मानोरा येथे रवाना झालो. मानोरा येथे तक्रारदार यांचेसोबत भेट झाली.सापळा पथकातील सर्वांना तसेच पंचांना सापळा कारवाई बाबत सुचना दिल्या.तक्रारदार यांना राठोड साहेब हे कार्यालयात आहेत किंवा नाही याची खात्री करणेकरीता सांगितले असता तक्रारदार यांनी राठोड यांना फोन लावून विचारणा केली असता राठोड हे खेडयावर गेले असून अर्धा तासात येतो असे सांगितले. परंतू अर्धा तास होवून देखील राठोड साहेबांचा फोन न आल्याने तक्रारदार यांनी परत राठोड यांना फोन केला असता राठोड यांनी सांगितले की,ते विठोली मध्ये आहेत. वरून आम्ही परत तक्रारदार तसेच पंच यांना सापळ्याबाबत सुचना दिल्या. तक्रारदार यांना लाच रक्कमेसह व व्हाईस रेकॉर्डर सह राठोड यांचे भेटीकरीता तालूका कृषी अधिकारी कार्यालय मानोरा येथे पाठविले तसेच सापळा पथक कार्यालयाचे परिसरात दबा धरून बसले. लगेच तक्रारदार हे पंच क्र.01 सह कार्यालयाचे बाहेर असलेल्या मानोरा ते दिग्रस रोडवर आले.थोडयाच वेळात गुण नियंत्रक अधिकारी राठोड हे त्यांचे फोर व्हीलर क्र.एम एच 37 ए एच 2736 ने तक्रारदार हे थांबून असलेल्या ठिकाणी आले. पंच क्र.01 यांना तक्रारदार व आरोपी हे स्पष्टपणे दिसत होते. तक्रारदार व राठोड यांचेमध्ये राठोड यांचे गाडीमध्ये संभाषण झाले व तक्रारदार यांनी उमेश राठोड यांना म्हटले की, ते वापस सॅम्पलच फक्त नोटीसच काही हे नका करू.., त्यावर उमेश राठोड तक्रारदार यांना म्हटले, त्याच लोड नका घेवु तुम्ही त्यावर तक्रारदार हे उमेश राठोड यांना म्हटले पंचविस हजार रूपये...मोजुन घेजा नाहित त्या नोटा मांग पुडे झाल्या होत्या म्हणुन म्हणल..यावर उमेश राठोड तक्रारदार यांना म्हटले, हं असे बोलून राठोड यांनी तक्रारदार यांचेकडून 25,000 रू लाच रक्कम स्विकारली व ती रक्कम एका कागदी लिफाफ्यात टाकली व तो लिफाफा त्यांच्या चारचाकी चे समोरील ड्रॉवरमध्ये ठेवला. त्यानंतर राठोड हे त्यांची चारचाकी घेवून समोर मानोरा शहरातील दिग्रस चौकाचे दिशेने निघाले. त्यानंतर पंच क्र.01 यांनी सापळा पथकातील पोहवा योगेश खोटे यांना फोन करून राठोड यांनी लाच रक्कम स्विकारली असून ते दिग्रस चौकाकडे निघून जात असल्याचे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने राठोड यांचे गाडीचा पाठलाग करून राठोड यांना त्यांचे भाडयाने राहत असलेले घर, खिराडे निवास , संभाजी नगर,मानोरा येथील पोर्चमधून ताब्यात घेतले. त्यांचे हाताची पंचासमक्ष अल्टाव्हायोलेट लाईट चे प्रकाशात पाहणी केली असता त्यांचे दोन्ही हातांचे तळव्यांवर अँन्था◌्रसिन पावडर आढळून आली.आरोपी राठोड यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांचेकडून स्विकारलेली लाच रक्कम 25,000रू ही फोर व्हिलर गाडीचे समोरील ड्रॉवरमध्ये कागदी लिफाफ्यात ठेवले असल्याचे सांगून पंचासमक्ष लाच रक्कम गाडीचे समोरील ड्रॉवरमधील लिफाफ्यामधून काढून दिली. लाच रक्कम पंचासमक्ष राठोड यांचेकडून हस्तगत करून आरोपी उमे◌्श राठोड यांना पुढिल कारवाई करीता पोलीस स्टेशन मानोरा येथे आणण्यात आले.आलोसे उमेश सुभाश राठोड,वय-31 वर्शे, पद- मंडळ कृषी अधिकारी,अतिरीक्त पदभार अधिकारी गुण नियंत्रण,तालूका कृषी अधिकारी कार्यालय,मानोरा ता.मानोरा जि.वाशिम यांनी तक्रारदार यांना त्यांचे कृषी केंद्राच्या दिलेल्या कारणे दाखवा नोटिस संबंधाने कारवाई न करण्याकरीता कृषी औषधी पुरवठा करणा-या कंपनीच्या बहाण्याने दि.13/08/2026 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान 30,000/- रुपये लाचेची स्पष्ट मागणी करून लाच रक्कम ही पुढिल आठवडयात स्विकारण्याचे मान्य केले. दिनांक 25/08/2026 रोजी तक्रारदार व आरोपी यांचे भेटीदरम्यान आरोपी यांनी लाच रक्कम 30,000/- रु येवजी 25,000/- रु स्विकारण्याची तयारी दर्शविली.दि.27/08/2026 रोजी सापळा कारवाई 15.14 वा. ते 15.46 वा. दरम्यान तालुका कृषी अधिकारी कार्यालय ,मानोरा चे बाहेरील मानोरा ते दिग्रस रोडवर आलोसे उमेश सुभाष राठोड,वय-31 वर्ष, पद- मंडळ कृषी अधिकारी,अतिरीक्त पदभार अधिकारी गुण नियंत्रण,तालूका कृषी अधिकारी कार्यालय,मानोरा ता.मानोरा जि.वाशिम रा.खोपडी मिरशी ता.दारव्हा जि.यवतमाळ ह.मु.खिराडे निवास ,संभाजी नगर,मानोरा ता.मानोरा जि.वाशिम यांनी तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष 25000रू लाच रक्कम स्विकारली. त्यांचे हे कृत्य कलम 7 भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे होत असल्याने माझी त्यांचे विरुध्द सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे(अल्का.एम.गायकवाड) पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.वाशिम



5/8

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
RAMESH AMARSING PAWAR
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): 63529
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** NAINA SHEKHAR PO
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPNSPF7101

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**